!! श्री !!

खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प २००/१२/०३/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# कुंभमेळ्यापूर्वी गोदावरी नदीची साफसफाई करा : खासदार चंद्रकांत खैरे यांची लोकसभेत मागणी

**दक्षिण काशी पैठण, त्र्यंबकेश्वर, नाशिक तीर्थक्षेत्राची स्वच्छता करण्याची केंद्रिय राज्यमंत्री सांबरलाल जाट यांच्याकडे आग्रही मागणी केंद्र सरकार अनूकूल**

**संभाजीनगर : ( ता. १२ )** महाराष्ट्राची सर्वात मोठी नदी म्हणुन गोदावरीची गणना केली जाते. त्र्यंबकेश्वर येथुन उगम होणाऱ्या या नदीवर श्रीक्षेत्र नाशिक, दक्षिण काशी पैठण, नांदेड यासारख्या धार्मीक क्षेत्राची जीवनदायी ठरत आहे. यामुळे केंद्र सरकारच्या गंगा शुध्दीकरण मोहिम, नर्मदा, यमुना नदी यासारख्या नद्याप्रमाणे गोदावरी नदीची साफसफाई करण्याची मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभेत केंद्रिय राज्यमंत्री सांबरलाल जाट यांच्याकडे केली.

यापुर्वी केंद्रियमंत्री तथा गंगा शुध्दीकरण विकासमंत्री उमा भारती यांची १५ जुलै २०१४ रोजी भेट घेऊन खासदार चंद्रकांत खैरे यांनी याबाबत निवेदन दिलेले आहे. त्याच अनुषंगाने केंद्रिय राज्यमंत्री सांबरलाल जाट यांनी केंद्र सरकार याबाबत सकारात्मक भुमिका घेत असुन नद्या बरोबर त्यावरील धार्मीक क्षेत्राचाही विकास करणार असल्याचे त्यांनी सांगितले. गोदावरी नदीवर हिंदू धार्मीयांचे पवित्र स्थळे असुन दर तीन वर्षानी सिंहस्थ कुंभमेळा नाशिक येथे भरतो. त्यामध्ये देशासह संपूर्ण भागातील साधू संत सहभागी होतात. शाहीस्नान ही पवित्र परंपरा आहे. त्याचबरोबर महाराष्ट्रातील व्दितीय सर्वात मोठी यात्रा श्रीक्षेत्र पैठण येथे संत एकनाथ महाराज यांच्या षठ्ठीला पवित्र यात्रा भरते.

योगायोगाने आज संत एकनाथ महाराजांची षठ्ठी आहे. जवळपास ५ ते ६ लाख भाविकांनी गोदावरी स्नान केले आहे. यामुळे शुध्दपाणी असले पाहिजे. प्रदुषणामुळे व औद्योगिकीरणामुळे नद्यांचे पावित्रता धोक्यात येत आहे. यामुळे केंद्राने गंगा शुध्दीकरण बरोबर गोदावरी नदीची स्वच्छता व साफसफाई मोहिम राबवण्याची आग्रही मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी केंद्रिय राज्यमंत्री जाट यांच्याकडे केली.

यासंबंधी उत्तर देतांनी राज्यमंत्री सांबरलाल जाट म्हणाले की केंद्र सरकारने या मुद्दयावर सकारात्मक पावले उचलले असुन गोदावरी नदीसाठी निश्चितपणे सरकार विचार करणार असल्यांचे सांगितले.

**प्रसिध्दी प्रमुख**

**योगेश पायघन / गणेश वाघ.**

कार्यालय : "खैरे निवास", वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३१११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400